 विशेष दिवाणी दावा क्र.०३/२०२०
नरसिंग .. वि .. वनिता
वादी तर्फे सा.क्र.२ **(नि.क्र.५०)**

**<u>नि.क्रं.७० वरील आदेशानुसार साक्षीदाराचा फेरतपास</u>**

**<u>फेरतपास शपथेवर वादीतर्फे ॲड. बी.बी.क्षीरसागर यांच्यामार्फत सुरु.</u>**

**१४.** माझ्या वडीलांचे नाव नरसिंग विठ्ठलराव पंडगे आहे. त्यांचे वय साधारण ८० वर्षे आहे. हा दावा त्यांनीच दाखल केलेला आहे. त्यांनी सरतपासही दाखल केला होता. त्यांच्या मागे दुखणे लागले, त्यांना चालता बोलता येईना म्हणून त्यांनी मला अधिकारपत्र दिले. आता मला अधिकारपत्र दाखविले. त्यावर माझी व वडीलांची सही व अंगठे आहेत. साक्षीदारांच्या सहया आहेत. नोटरी वकील श्री.पी.एस.पौळ यांच्याकडे सदर अधिकारपत्र नोंद केले. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी ७१** देण्यात येते.

**<u>उलटतपास प्रतिवादींचे विधीज्ञ श्री.डी.एल.घोगरे यांच्यावतीने पुढे सुरु</u>**

**१५.** तहसील कचेरी अहमदपूर च्या समोर पौळ वकीलांचे ऑफीस आहे. तिथे हा दस्त केला. हे खरे की, पौळ वकीलांचे ऑफीस आणि न्यायालय यांच्या दरम्यान फक्त रस्ताच आहे. हे खरे की, माझे वडील पौळ वकीलांच्या ऑफीसात दस्ताच्या वेळी आले होते. हे खरे नाही की, माझे वडील जर पौळ वकीलांच्या ऑफीसात येऊ शकतात तर न्यायालयातही येऊ शकतात. न्यायालय ते माझ्या वडीलांचे घर १ कि.मी अंतर आहे. दावा घरापासून माझे वडील १ कि.मी.अंतरावर राहतात. हे खरे नाही की, दावामिळकतीत वादीचा ताबा नाही. हे खरे नाही की, वडील न्यायालयात आले तर दावामिळकतीसंबंधी खरी परिस्थीती न्यायालयात येईल म्हणून मी त्यांचे अधिकारपत्र करुन घेतले. मला भाऊ आहे. बहीण नाही. त्याचे नाव सचिन असून तो काय करतो हे मला माहिती नाही कारण तो इथे राहत नाही. माझी आई मयत आहे. तिचे वारसप्रमाणपत्र काढलेले आहे. त्यात सचिनचे नाव आहे. हे खरे नाही की, त्यात मी एकटीच वारस असल्याचे दाखवून माझ्या एकटीच्याच नावे वारसा प्रमाणपत्र काढलेले आहे. वडीलांचा वैदयकीय दाखला की, ते न्यायालयात हजर राहू शकत नाहीत असा दाखल नाही. सर्वाधिकारपत्रातही तो दाखला जोडलेला नाही. हे खरे नाही की, वडील साक्ष देऊ शकतात. हे खरे नाही की, अधिकारपत्र

खोटेपणाने केले.

**उलटतपास पूर्ण.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

समक्ष

स्वाक्षरीत/-

**( एस.एन.सरडे )**

दिनांक ३०/०१/२०२६.                दिवाणी न्यायाधीश व. स्तर,अहमदपूर.